लोकमत

## महाविद्यालय मान्यतेचा प्रश्न : सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणशास्त्रचा निकाल रोखला

# विद्यार्थ्यांसाठी राजू शेट्टींनी घेतली कुलगुरूंची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उजळाईवाडीची मान्यता रद्द केल्याने ७८ विद्यार्थ्यांचा निकाल शिवाजी विद्यापीठाने रोखला आहे. या विद्यार्थ्यांसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी मंगळवारी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली. हा विषय न्यायप्रविष्ट आहे, तरीही विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ. शिंदे यांनी दिली.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून तीन बॅचेस पूर्ण झाल्यानंतर चौथ्या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयाची मान्यता रद्द केली. तरीही संस्थेने अभ्यासक्रम पूर्ण केला, विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या आणि निकालही तयार झाला; पण विद्यापीठाने ७८ विद्यार्थ्यांचा निकाल रोखून धरला. संस्थेने उच्च न्यायालयात दाद मागितली, पण येथे विद्यापीठाच्या बाजूने निकाल लागला.

याबाबत, मंगळवारी खासदार राजू शेट्टी यांनी कुलगुरु डॉ. शिंदे यांना महाविद्यालयात काही त्रुटी होत्या, तर प्रवेश लिस्टमध्ये तुम्ही नाव का दिले? विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन शैक्षणिक वर्ष पूर्ण करून परीक्षा देईपर्यंत विद्यापीठाने हस्तक्षेप का केला नाही? अशी विचारणा केली. तुमच्या डोळेझाकपणामुळे ७८ विद्यार्थ्यांच्या भविष्यात अंधार पसरला आहे, त्याला जबाबदार कोण? संबंधितांचे निकाल तत्काळ द्या, अशी मागणी शेट्टी यांनी केली. यावर संबंधित वाद हा आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत महाविद्यालयीन सलग्नता तपासणी समितीपुढे प्रस्ताव ठेवतो. त्यानंतर न्यायालयात निकाल दाखल करून विद्यार्थ्यांना लवकरात लवकर न्याय देण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही डॉ. शिंदे यांनी दिली. यावेळी प्राचार्य व्ही. एम. पाटील, सुरेश पाटील, किरण भोसले यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# सत्यजित पाटीलचे राष्ट्रपती पदक युवकांना आदर्शवत

**राधानगरी / शशिकांत बैलकर :**
कुस्तीपटूचे गाव, गुऱ्हाळघरे असलेले गाव, पैलवानांचे गाव, शिष्यवृत्ती परीक्षाधारक विद्यार्थ्यांचे गाव अशी बिरुदे लाभलेल्या अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील संशोधक मंडळींनी या गावचे नाव एका नव्या वळणावर आणून ठेवले आहे. सत्यजित पाटील या युवकाने आपल्या अभ्यासाच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती पदक पटकावले आहे. अर्जुनवाडा गावचे नाव देश-विदेशात झळकावले आहे. ग्रामीण भागातील ध्येयवादी युवकाने शिक्षण क्षेत्रात यशाची सुवर्ण मोहोर उमटवली आहे.



### आत्मविश्वासाचा फायदा

सतत कष्टाची तयारी, पुढील भविष्याचे नियोजन, जिद्द, आत्मविश्वास ठेवून कार्यरत राहिल्यास निश्चितच यश मिळते. भविष्यात संशोधनाचा फायदा अध्यापन क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रयत्न करणार.

- **सत्यजित पाटील,** युवा संशोधक, अर्जुनवाडा.

गावात घरटी एक पैलवान आहे. याच गावात शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्ती मिळवणारे विद्यार्थी संख्येने अधिक आहेत. संशोधक जे. डी. यादव यांनी रासायनिक पाण्यावर प्रक्रिया करून शुद्ध पाणी मिळवणारा जगभर नावलौकिक प्रयोग यशस्वी केला. त्या पाठोपाठ अर्जुनवाडा येथील युवा संशोधक सत्यजित संजय पाटील याने आपले एम.एस्सी. भौतिकशास्त्र शिक्षण पूर्ण करत राष्ट्रपती पदक पटकावले. संजय पाटील या युवकाने प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण दूध साखर विद्यानिकेतन बिद्री येथे पूर्ण केले आहे. आवडीनुसार विज्ञान शाखेसाठी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे प्रवेश घेतला. सत्यजित यांनी विशेष गुणवत्ता श्रेणीत उत्तीर्ण होऊन बी.एस्सी.पदवी संपादन केली. एम.एस्सी.भौतिकशास्त्र शिक्षण अंतिम टप्प्यात असतानाच शिवाजी विद्यापीठमधील सर्वोच्च मानाचे राष्ट्रपती पदक पटकावले.

सत्यजित पाटील यांचे वडील बिद्री येथील दूध साखर महाविद्यालयात मराठीचे विभाग प्रमुख असून आई गृहिणी आहेत. सत्यजितने विज्ञानातील संशोधन करण्याचा ध्यास घेऊन मार्गक्रमण सुरू ठेवले आहे. सोलर सेल या विषयावर डॉ.पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन सुरू केले आहे, तर भविष्यात मटेरियल सायन्स या विषयात संशोधन करून वडिलाप्रमाणे अध्यापन क्षेत्रात करिअर करायचे या ध्येयाने सत्यजितची घोडदौड सुरू आहे. सत्यजित पाटील याने शिक्षण गुणवत्ता, एन.एस.एस., एन.सी.सी., भाषा शुद्धता, वर्तणूक, नेतृत्वगुण,संशोधन, आवड या सर्व निकषांची पडताळणी करून त्यास राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. सत्यजित पाटील याला राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याची बातमी अर्जुनवाडा येथे बातमी कळताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

### कष्टाची तयारी ठेवा

मुलांच्या आवडीनुसार त्यांना करिअर करण्याची संधी उपलब्ध करून दिली तर ते निश्चितच यशस्वी होतात. ग्रामीण आणि शहरी असा करिअरमध्ये भेदभाव नाही. फक्त कष्टाची तयारी मुलांनी ठेवली पाहिजे.

**प्रा.संजय पाटील,** अर्जुनवाडा.

पुढारी

# विद्यापीठात आज 'बोलू कवतिके' कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठात बुधवारी (दि.२७) सायंकाळी सहा वाजता 'बोलू कवतिके...' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना गीत, संगीत व नृत्याची मेजवानी मिळणार आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याचे औचित्य साधून शासनातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रसिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज विविध उपक्रमांचे आयोजन

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठ आणि राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (२७ फेब्रुवारी) मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येणार आहे. बुधवारी सायंकाळी ६ वाजता विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात 'बोलू कवतिके' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ही माहिती दिली.

२७ रोजी सायंकाळी ६ वाजता मोहन पारसनीस व ओंकार भिसे निर्मित 'बोलू कवतिके' या मराठी भाषेचे महत्त्व जनमानसावर ठसविणाऱ्या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मराठी अधिविभागातर्फेही मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत. २७ रोजी सकाळी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर ११.३० वाजता 'महाराष्ट्राची कीर्तन परंपरा' या विषयावर ह.भ.प. कुंडलिक पाटील यांचे व्याख्यान होईल. दुपारी १ वाजता विभागातर्फे ग. दि. माडगूळकर जन्मशताब्दीच्या निमित्ताने 'राम जोशी' हा चित्रपट दाखविण्यात येईल. गुरुवारी (ता. २८ फेब्रुवारी) सकाळी 'म्हणींतले समाजदर्शन : पश्चिम महाराष्ट्रातील म्हणी विशेष' या विषयावर विद्यार्थी सादरीकरण करतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयसिंगपूरचे डॉ. मोहन पाटील उपस्थित असतील. १ मार्च रोजी दुपारी १२ वाजता 'रंग लोककलेचे' ह विशेष कार्यक्रम अवतांबर शिरढोणक आणि त्यांचे सहकारी सादर करतील.

### महावीरमध्ये परिसंवाद

महावीर कॉलेजमध्ये 'मॉरिशसमधील मराठी भाषा आणि संस्कृती' या विषयाव परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. राम मालु, सोना धार्मिया, होमराजन गोवरिया हे मॉरिशसचे नागरिक सहभागी होणार आहे.




न्यू कॉलेज येथे डॉ. अरुण शिंदे यांचे मराठीची गौरवगाथा यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2019
तरुण भारत

# विद्यापीठात आज बोलू कवतिके कार्यक्रम

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात येत असलेल्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठात आज (ता २७) सायंकाळी ६ वाजता 'बोलू कवतिके...' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

मोहन पारसनीस व ओंकार भिसे यांची निर्मिती लाभलेल्या या कार्यक्रमात अभिनेत्री हेमांगी कवी यांच्यासह प्रवीण जोशी, अनिरुद्ध दडके सहभागी होणार आहेत. कार्यक्रमातील गीतांना हेमंत वाळुंजकर, संजीव मेहेंदळे, अशोक काळे, मंजिरी जोशी आणि अनुराधा मराठे यांचा स्वरसाज लाभला आहे. हा सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज 'बोलू कवतिके...'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

राज्य सरकार व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठात आज, (ता. २७) सायंकाळी ६ वाजता 'बोलू कवतिके...' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना गीत, संगीत व नृत्याची मेजवानी मिळणार आहे. यंदा 'मराठी म्हणी' या मध्यवर्ती कल्पनेच्या अनुषंगाने भाषा दिन साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमात अभिनेत्री हेमांगी कवी यांच्यासह प्रवीण जोशी, अनिरुद्ध दडके सहभागी होणार आहेत. कार्यक्रमातील गीतांना हेमंत वाळुंजकर, संजीव मेहेंदळे, अशोक काळे, मंजिरी जोशी आणि अनुराधा मराठे यांचा स्वरसाज लाभला असून केदार परांजपे यांनी संगीत संयोजन केले आहे.

विक्रम भट, डॉ. राजेंद्र दूरकर, राजू साळुंके, विवेक परांजपे, केदार परांजपे व पंडित रमाकांत परांजपे यांचे वादन सहकार्य लाभले आहे. नृत्यप्रस्तुती प्राजक्ता राज अत्रे यांची असून प्रवीण जोशी यांनीच संहिता लेखन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2019 लोकसत्ता

# मराठीच्या वैभवात दीड हजार नव्या शब्दांची भर

## विश्वकोशातील नोंदींच्या अद्ययावतीकरणाचा पहिला टप्पा पूर्ण

प्रतिनिधी, पुणे

**मराठी भाषेच्या** वैभवामध्ये लवकरच दीड हजार नव्या शब्दांची भर पडणार आहे. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने पूर्वी प्रकाशित केलेल्या २० खंडांतील नोंदींच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेतले असून त्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण झाला आहे. मंडळाने विश्वकोश मुद्रित माध्यमामध्ये प्रकाशित न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असल्यामुळे यापुढील काळात विश्वकोश, कोशातील नव्या नोंदी आणि कुमार विश्वकोशाचे तीन खंड www.marathivishwakosh.org या नव्या संकेतस्थळावर पाहता येणार आहेत.

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिन आणि मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी ही माहिती दिली. विश्वकोशातील जुन्या नोंदींच्या अद्ययावतीकरणाचे काम मंडळाने हाती घेतले आहे. हे काम सातत्याने सुरू राहणार असून गेल्या तीन वर्षांमध्ये महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांमध्ये ४७ विषयनिहाय ज्ञानमंडळांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठी विज्ञान परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद अशा संस्थांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात प्रामुख्याने विज्ञान, अभिजात भाषा आणि साहित्य, अर्थशास्त्र, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती, वैज्ञानिक चरित्रे आणि विज्ञान संस्था, सामरिकशास्त्र आणि राष्ट्रीय सुरक्षा, संगीत अशा विविध विषयांमधील नोंदी आहेत.

यात ज्ञानमंडळांच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात तयार करण्यात आलेल्या दीड हजारांहून अधिक नोंदी लवकरच संकेतस्थळावर उपलब्ध होतील. हे काम अव्याहत सुरू राहावे, या उद्देशातून ज्ञानमंडळांच्या कार्यकालाला २२ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे करंबेळकर यांनी सांगितले.

विश्वकोशाच्या संकेतस्थळासाठी भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान, कायदा, प्राचीन ऐतिहासिक काळ, विश्वसाहित्य, विद्युत अभियांत्रिकी, धातुविज्ञान, खाणविज्ञान, संगीत अशा विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यासंबंधित विषयांची माहिती लोकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचविण्यासाठी कार्यरत आहेत. यामध्ये डॉ. बाळ फोंडके, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. नीरज हातेकर, डॉ. गौरी माहुलीकर विषयपालक म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, पीएच.डी. चे विद्यार्थी नोंदीसाठी मदत करत आहेत, असे दिलीप करंबेळकर यांनी सांगितले.



### विश्वकोशाला संवादी सूर

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीमधील नोंदींना दृक्-श्राव्य माध्यमाची (व्हिडीओची) जोड देण्यात आली आहे. त्यामुळे विश्वकोश संवादी होणार असून या नोंदी समजून घेण्यासाठी मदत होईल. डहाका, खडी गंमत, खंडोबाचे जागरण, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन, गानसरस्वती किशोरी आमोणकर, आंतरराष्ट्रीय घडामोडी अशा काही नोंदींमध्ये हे व्हिडीओ दिसतील. अशाच प्रकारे अन्य ज्ञानमंडळांच्या नोंदींनाही ऑडीओ, व्हिडीओची जोड देण्यात येणार आहे.

लोकमत

## शिवराम भोजे : सायबर महाविद्यालयात चर्चासत्र

# संशोधन हे व्यापक, समाजहितासाठी असावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधन हे केवळ प्रकाशनासाठी किंवा पदवी प्राप्त करण्यासाठी नसावे, तर ते व्यापक व समाजहितासाठी असावे, सामाजिक विकासाला चालना देणारे असावे, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. शिवराम भोजे यांनी दिले.

सायबर महाविद्यालयात आयसीएसएसआर मुंबई पुरस्कृत 'संशोधनातील गुणवत्ता' या दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. भोजे म्हणाले, तंत्रज्ञानातील गुणवत्तापूर्वक संशोधनामुळे काही क्षेत्रांमध्ये आपल्या देशाला जागतिक पातळीवर नावलौकिक कमविता आला आहे. अशा प्रकारच्या कार्यशाळेमधून नवीन संशोधकांना दिशा मिळू शकेल, असा आशावाद व्यक्त करून संशोधनात गुणवत्ता असलीच पाहिजे, असे ते म्हणाले.



सायबर कॉलेज येथे 'संशोधनातील गुणवत्ता' चर्चासत्रात डॉ. शिवराम भोजे यांनी मंगळवारी मार्गदर्शन केले.

टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई येथील डॉ. बाल मुर्गन, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. अरविंद गुलबाके यांनी मार्गदर्शन केले.

चर्चासत्राचे समन्वयक डॉ. बाबू झकेरिया यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सी. एस. काळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे यांनी सायबर संस्थेचा आढावा घेतला. 'नॅक'चे समन्वयक डॉ. टी. व्ही. जी. सर्मा यांनी आभार मानले.

कार्यशाळेत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व आंध्र प्रदेश येथील सुमारे ५२ प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यावेळी कार्यशाळेत संचालक डॉ. एम. एम. अली, प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी, डॉ. आर. व्ही. कुलकर्णी, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. ए. डी. इकल, डॉ. दीपक भोसले, प्रशासकीय अधिकारी विनायक साळोखे, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

सकाळ

# 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' उद्यापासून

## उत्सुकता शिगेला ; संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत संवाद मालिका

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २६ : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (ता. २८)पासून सलग चार दिवस संजय घोडावत ग्रुप स्टार एअर प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' हा अनोखा कार्यक्रम रंगणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात रोज सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत ही पर्वणी मिळणार असून, 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगर येथील कार्यालयात मोफत सन्मानिका उपलब्ध केल्या आहेत. उद्या (ता. २७) सायंकाळी पाचपर्यंतच सन्मानिका मिळणार असून, सन्मानिका असलेल्यांनाच प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे.**

'सकाळ'ने चार वर्षांपूर्वी या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नववर्षाचा प्रारंभ आणि 'सकाळ'चा 'ऊर्जा' हा उपक्रम हे आता एक समीकरणच झाले असून, विविध क्षेत्रांतील यशोलौकिकाच्या शिलेदारांशी संवाद साधण्याची ही एक पर्वणी असते. यापूर्वी बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेते अतुल कुलकर्णी, बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, गणितज्ज्ञ आनंद कुमार, प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र पटेल, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचे दिग्दर्शक राजेश मापुस्कर, अभिनेता श्रेयस तळपदे, रॅमन मॅगसेसे पुरस्कारविजेत्या नीलिमा मिश्रा आदींशी संवाद साधण्याची संधी मिळाली होती. यंदाही हीच परंपरा पुढे कायम राहणार आहे.

गुरुवारी (ता. २८) प्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे, १ मार्चला सांगलीचे पोलिस अधीक्षक सुहैल शर्मा, २ मार्चला पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, ३ मार्चला महिला उद्योजिका जयंती कठाळे यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. 'ऊर्जा- संवाद ध्येयवेड्यांशी' उपक्रमाला पाच वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले असून, गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.



> प्रत्येकाच्या नसानसांत सकारात्मकतेची बीजं पेरणारा 'ऊर्जा' हा उपक्रम असून, प्रत्येक वर्षी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. संजय घोडावत ग्रुपच्या माध्यमातूनही समाजाच्या भल्यासाठी आवश्यक उपक्रमांवर नेहमीच भर दिला जातो. 'ऊर्जा'च्या माध्यमातूनही आमचा तोच प्रामाणिक प्रयत्न असतो.
>
> – संजय घोडावत, अध्यक्ष, संजय घोडावत ग्रुप स्टार एअर

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

### असे होतील संवाद

| २८ फेब्रुवारी | १ मार्च | २ मार्च | ३ मार्च |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| सुबोध भावे | सुहैल शर्मा | डॉ. रवींद्र कोल्हे | जयंती कठाळे |

### प्रायोजक असे...

- **टायटल स्पॉन्सर :** संजय घोडावत ग्रुप स्टार एअर
- **सहप्रायोजक :** तनिष्क शोरूम, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन, मार्व्हलस इंजिनिअर्स
- **हॉस्पिटॅलिटी पार्टनर :** हॉटेल सयाजी
- **ट्रॅव्हल पार्टनर :** मोहन ऑटो इंडस्ट्रीज प्रा. लि.
- **फर्निचर पार्टनर :** लकी फर्निचर

चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करूया. २८ फेब्रुवारी ते ३ मार्चची सायंकाळ नवप्रेरणादायी करूया...!

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

- **सूरज (९५५२५८१९१८),**
- **उत्तम (९६२३५३३५४७)**